**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक :- २९/०९/२०१८

## मालेगावातील देशीदादाची निघृण हत्या करणारे मारेकरी ०६ तासात जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पवारवाडी पोलीसांची कारवाई

---

दिनांक २८ सप्टेंबर २०१८ रोजी रात्री २०:४५ वा. चे सुमारास मालेगाव शहरातील बजरंगवाडी परिसरातील बालाजी चौक, मिर्झा सायकल मार्ट समोर इसम नामे **अब्दुल रहिम निसार अहमद उर्फ देशीदादा** यास अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणावरून धारदार शस्त्राने डोक्यावर, मानेवर, तोंडावर व शरीरावर प्रहार करून गंभीररित्या जखमी करून जिवे ठार मारले होते. सदर घटनेचे वृत्त समजताच मालेगाव शहरातील वरिष्ठ पोलीस अधिका-यांसह पोलीस फौज तात्काळ घटनास्थळावर पोहचली. सदर बाबत **आझादनगर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ११८/२०१८** भादवि कलम ३०२ सह आर्म अॅक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल सो,** पोलीस उपअधीक्षक श्री.रत्नाकर नवले, पोलीस उपअधीक्षक श्री. अजित हगवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोलीस निरीक्षक मसुद खान, दिलीप पारेकर, ठाकुरवाड, भदाणे, सपोनि वांगडे यांचे पथकांनी मालेगाव शहरात अज्ञात मारेक-यांचा कसोशिने तपास सुरू केला.

दरम्यान सदर गुन्हयातील मयत देशीदादा याचे हत्येबाबत तपासपथकांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तपास सुरू केला. सदर गुन्हयाचे घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच घटनास्थळावरील परिस्थितीचा आढावा घेवुन तपास पथकांनी अज्ञात मारेक-यांचा शोध सुरू केला. मयत इसम **अब्दुल रहिम निसार अहमद उर्फ देशीदादा** याचा पुर्व इतिहास व सध्याची पार्श्वभुमी याबाबत **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी गोपनीय माहिती घेवुन तपासाची चक्रे फिरविली. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने धुळे शहरातील सुरत जाणारे रोडवर सापळा रचुन सदर गुन्हयातील मुख्य गुन्हेगार **नामे १) जलील अहमद मोहम्मद हसन उर्फ जल्ला दादा,** वय ५२, रा. नयापुरा, मालेगाव, व **२) मोहम्मद इस्माईल करीम अहमद उर्फ अयौव्वा,** वय ३५, रा. गोल्डनगर, कालीखोली, मालेगाव यांना शिताफिने ताब्यात घेतले. तसेच मालेगाव पवारवाडी पोलीस ठाण्याचे **सपोनि श्री. सचिन वांगडे** यांचे पथकानेही संशयीत इसम **३) मसुद अख्तर मोहम्मद अमीन,** वय २३, रा. खलिल हायस्कुलजवळ, मोहम्मदाबाद, मालेगाव, **४) नफिज अहमद मोहम्मद सलिम,** वय २१, रा. मोहम्मदाबाद, मालेगाव, **५) महेफुज रहेमान मुस्ताक अहमद,** वय २२, रा. गोल्डन नगर, मालेगाव, **६) सलिम अहमद सईद अहमद,** वय २६, रा. मोती हायस्कुल समोर, मालेगाव यांना ताब्यात घेतले. वरील ताब्यात घेतलेले एकुण ०६ गुन्हेगारांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सर्वांनी मिळुन **अब्दुल रहिम निसार अहमद उर्फ देशीदादा** याचेवर धारदार शस्त्रांनी तोंडावर, मानेवर, डोक्यात व शरीरावर वार करून जिवे ठार मारले असल्याची कबुली दिली आहे. तसेच सदर गुन्हयात काही गुन्हेगारांनी गुन्हा करतेवेळी वापरलेली हिरो एच.एफ.डिलक्स मोटर सायकलही पवारवाडी पोलीसांनी जप्त केली आहे. ताब्यात घेतलेले गुन्हेगारांनी पुर्ववैमनस्यातुन सदर खुनाचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले असुन सर्वांना गुन्हयाचे पुढील तपासकामी मालेगाव आझादनगर पोलीस ठाणेस हजर करण्यात हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सचुनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** व पवारवाडी पोलीस ठाण्याचे **सपोनि सचिन वांगडे** यांचे पथकांनी ०६ तासात सदर खुनाचे गुन्हयातील आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.